# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांक:21.01.2026** **वार:बुधवार**

---

1. जागतिक उद्योग भारताला एक विश्वासार्ह पुरवठा-साखळी भागीदार म्हणून पाहत असल्याचं इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्री अश्विनी वैष्णव यांचं प्रतिपादन
2. भविष्यवेधी प्रणालींसाठी महाराष्ट्र राज्यासोबत सहकार्य करण्याचं जागतिक नेत्यांना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचं आवाहन
3. भाजपाचे बारावे राष्ट्रीय अध्यक्ष म्हणून नितिन नोबीन यांच्या नावाची औपचारिक घोषणा
4. शाश्वत प्रगती आणि प्रशिक्षकांचं कौशल्य अद्ययावत ठेवण्यासाठी उद्योगांनी सहकार्य करावं, केंद्रीय कौशल्य विकास आणि उद्योजकता मंत्रालयाचं आवाहन आणि
5. सायना नेहवालची बॅडमिंटनमधून निवृत्ती

**<u>दावोस-अश्विनी वैष्णव</u>**

भारताच्या कृत्रिम बुद्धिमत्ता आधारित परिसंस्थेसाठी गुगलनं आपली वचनबद्धता अधिक दृढ केली असून ज्यामध्ये आंध्र प्रदेशातील विशाखापट्टणम इथं 15 अब्ज डॉलर्सचं एआय डेटा सेंटर आणि भारतीय स्टार्टअप्ससोबत भागीदारी यांचा समावेश आहे, असं इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्री अश्विनी वैष्णव यांनी समाजमाध्यमावरील संदेशात म्हटलं आहे. स्वित्झर्लंडमधील दावोस इथं आयोजित जागतिक आर्थिक मंच शिखर परिषदेत मंत्री अश्विनी वैष्णव सहभागी झाले आहेत. भारत डिझाइन, फॅब्रिकेशन, पॅकेजिंग, साहित्य, वायू आणि उपकरणे यासह संपूर्ण सेमीकंडक्टर परिसंस्था तयार करत असून जागतिक उद्योग भारताला एक विश्वासार्ह पुरवठा-साखळी भागीदार म्हणून पाहत आहे,असंही ते म्हणाले.

**<u>महा-दावोस</u>**

स्वित्झर्लंडमधील दावोस इथं जागतिक आर्थिक मंचाच्या निमित्तानं एका संयुक्त पत्रकार परिषदेत केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव आणि, महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी माध्यमांना संबोधित केलं. उत्पादन, उद्योग, कृत्रिम बुद्धिमत्ता, सेमीकंडक्टर आणि थेट परकीय गुंतवणूक या क्षेत्रांमधील भारताच्या वाढीबद्दल त्यांनी आपले विचार मांडले. वैष्णव म्हणाले की, सर्वात प्रगत दोन नॅनोमीटर चिप्स आता भारतात डिझाइन केल्या जातील आणि आम्ही यावर स्टार्टअप सुरू करणार आहोत. भारताच्या औद्योगिक विकासावर बोलताना फडणवीस म्हणाले की, भारत डिजिटल सार्वजनिक पायाभूत सुविधांना पुढील पिढीच्या तंत्रज्ञानामध्ये रूपांतरित करण्यासाठी काम करत आहे.

**<u>दावोस</u>**

महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल दावोस इथं जागतिक आर्थिक मंच शिखर परिषदेच्या अनुषंगानं जर्मनी, ब्राझील, फ्रान्स, बर्मुडा, गॅबॉन, यूएई आणि आफ्रिकन युनियनच्या नेत्यांसोबत विविध

विषयांवर महत्त्वपूर्ण संवाद साधला. डिजिटल सार्वजनिक पायाभूत सुविधेचं यश हे व्याप्तीवर अवलंबून होतं, तर पुढील युग हे विश्वासावर आधारित असेल, असं मुख्यमंत्री म्हणाले. महाराष्ट्र राज्य हे कृत्रिम बुद्धिमत्ता-सहाय्यित प्रशासन, भविष्यवेधी सेवा वितरण आणि नागरिक-केंद्रित उत्तरदायित्व प्रणालींचं अवलंबन करून या नव्या बदलाचं नेतृत्व करत आहे, असंही मुख्यमंत्र्यांनी यावेळी बोलताना सांगितलं. या भविष्यवेधी प्रणालींसाठी महाराष्ट्र राज्यासोबत सहकार्य करण्यासाठी जागतिक नेत्यांना मुख्यमंत्र्यांनी आमंत्रित केलं.

**निवडणूक आयोग परिषद**

निवडणूक आयोगानं नवी दिल्लीत आज 'लोकशाही आणि निवडणूक व्यवस्थापनावरील आंतरराष्ट्रीय परिषदेचं आयोजन केलं आहे. या तीन दिवसीय परिषदेत जगभरातील 70 हून अधिक देशांचे प्रतिनिधित्व करणारे सुमारे शंभर आंतरराष्ट्रीय प्रतिनिधी सहभागी होणार आहेत. तसंच या परिषदेत आंतरराष्ट्रीय संस्था, भारतातील परदेशी दूतावास, शिक्षण तज्ञ आणि निवडणूक व्यवस्थापन क्षेत्रातील तज्ञही सहभागी होणार आहेत. या परिषदेदरम्यान, निवडणूक आयोग विविध निवडणूक व्यवस्थापन संस्थांसोबत 40 हून अधिक द्विपक्षीय बैठका घेणार आहे. लोकसभा 2024 निवडणुकीची प्रक्रिया अधोरेखित करणारी 'इंडिया डिसाइड्स' ही माहितीपट मालिका देखील या परिषदेत आज प्रदर्शित करण्यात येणार आहे.

**नितीन नबीन**

भारतीय जनता पार्टीचे बारावे राष्ट्रीय अध्यक्ष म्हणून नितीन नबीन यांच्या नावाची औपचारिक घोषणा काल नवी दिल्लीच्या भाजपा मुख्यालयात पक्षाचे निवडणूक निर्णय अधिकारी डॉ. के लक्ष्मण यांनी केली. नितीन नबीन हे भाजपाचे आतापर्यन्तचे सर्वात तरुण अध्यक्ष आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नबीन यांचं अभिनंदन करत त्यांचा सत्कार केला. नबीन हे देशातील राजकीय, सामाजिक आणि आर्थिक परिवर्तन पाहणाऱ्या पिढीतील आहेत. त्यांच्यातील तरुणाईची ऊर्जा आणि त्यांच्या संघटनात्मक कौशल्य आणि कामाच्या व्यापक अनुभवाचा पक्षाला फायदा होईल. त्यांच्यावर केवळ पक्षाचीच नाही तर, राष्ट्रीय लोकशाही आघाडीत समन्वय साधण्याची जबाबदारी आहे असं पंतप्रधान यावेळी बोलताना म्हणाले. याप्रसंगी केंद्रीय मंत्री अमित शाह, राजनाथ सिंह, नितीन गडकरी यांच्यासह अनेक मंत्री आणि भाजपा नेते उपस्थित होते.

**जि. प. निवडणूक**

महाराष्ट्र राज्यातील 12 जिल्हा परिषदा आणि 125 पंचायत समित्यांसाठीच्या निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज भरण्याची मुदत आज संपत आहे. उद्या म्हणजे 22 जानेवारीला अर्जांची छाननी होईल तर, 27 जानेवारीपर्यंत अर्ज मागे घेता येतील. 27 जानेवारीलाच अंतिम उमेदवार यादी आणि चिन्ह वाटप करण्यात येईल. 5 फेब्रुवारी रोजी मतदान होणार आहे.

**पीएमसेतु-समारोप**

पुण्यात आयोजित 'पीएम सेतू' कार्यक्रमाचा काल समारोप झाला. शाश्वत प्रगतीसाठी तसंच प्रशिक्षकांचं कौशल्य सतत अद्ययावत ठेवण्यासाठी उद्योगांनी सहकार्य करावं, असं आवाहन केंद्रीय कौशल्य विकास आणि उद्योजकता मंत्रालयाच्या सचिव देबाश्री मुखर्जी यांनी याप्रसंगी बोलताना केलं. आयटीआय संस्थांचं आधुनिकीकरण केवळ पायाभूत सुविधांपुरतं मर्यादित न ठेवता, प्रशिक्षणाची गुणवत्ता आणि रोजगारक्षमता वाढवण्यावर भर देणे गरजेचं आहे असं त्या म्हणाल्या. यावेळी मुखर्जी यांनी 40हून अधिक आघाडीच्या कंपन्यांच्या प्रतिनिधींशी संवाद साधला.

**मत्स्यव्यवसाय परिषद**

नवी दिल्लीत आज मत्स्यव्यवसाय विभागानं एका गोलमेज परिषदेचं आयोजन केलं आहे. या परिषदेत 83 देशांचे राजदूत आणि उच्चायुक्त सहभागी होणार आहेत. द्विपक्षीय व्यापार, सागरी खाद्यपदार्थांच्या निर्यातीला प्रोत्साहन आणि आंतरराष्ट्रीय बाजारपेठेशी संबंध दृढ करणं हा या परिषदेचा उद्देश आहे. मत्स्यव्यवसाय, पशुसंवर्धन आणि दुग्धव्यवसाय मंत्री राजीव रंजन सिंह यांच्या अध्यक्षतेखाली ही परिषद होत आहे. मूल्यवर्धित सागरी खाद्यपदार्थांच्या व्यापाराला चालना देण्यावर या परिषदेत लक्ष केंद्रित केलं जाणार असून गुंतवणूक, संयुक्त उपक्रम, तंत्रज्ञान हस्तांतरण आणि क्षमता बांधणीसाठी संधीबाबत चर्चा या परिषदेत होणार आहे.

**ट्रम्प कार्यकाळ**

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी त्यांच्या कार्यकाळाचं एक वर्ष पूर्ण केल्यानिमित्त, देशभरातील आंदोलनकर्त्यांनी त्यांच्या धोरणांविरुद्ध निदर्शनं केली. ट्रम्प यांच्या कृतींमुळे अमेरिकेच्या जागतिक प्रतिष्ठेला धक्का बसला असून दीर्घकाळच्या मित्रत्वाच्या संबंधांना कमकुवत केलं आहे, असं आंदोलकांनी सांगितलं. तर राष्ट्राध्यक्ष ट्रम्प यांनी आपल्या एक वर्षाच्या कामगिरीबद्दल बोलताना पत्रकार परिषदेत सांगितलं की, त्यांच्या प्रशासनानं मागील कोणत्याही प्रशासनापेक्षा अधिक यश मिळवलं असून विशेषतः लष्कर मजबूत करण्यात आणि युद्धे संपवण्यात चांगली कामगिरी केली आहे.

**ट्रम्प-जी 7 नकार**

ग्रीनलँड ताब्यात घेण्याच्या अमेरिकेच्या प्रयत्नांमुळे वाढलेल्या तणावाच्या पार्श्वभूमीवर, फ्रेंच राष्ट्राध्यक्ष इमॅन्युएल मॅक्रॉन यांनी प्रस्तावित केलेल्या जी-7 च्या आपत्कालीन बैठकीला अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी उपस्थित राहण्यास नकार दिला आहे. ते काल आपल्या दुसऱ्या कार्यकाळाच्या एक वर्षपूर्तीनिमित्त व्हाईट हाऊसमध्ये आयोजित पत्रकार परिषदेत बोलत होते.

**छत्तीसगड नक्षलवादी**

छत्तीसगडमध्ये, सोमवारी गरियाबंद जिल्ह्यात नऊ नक्षलवाद्यांनी शस्त्र खाली ठेवली. यापैकी अंजू नावाच्या महिलेनं गरियाबंद जिल्ह्यात सक्रिय असलेल्या इतर नक्षलवाद्यांना शस्त्रे खाली ठेवून शरण येण्याचं आवाहन केलं आहे. छत्तीसगडमध्ये, गेल्या दोन वर्षांत दोन हजारांहून अधिक नक्षलवादी शरण येऊन ते समाजाच्या मुख्य प्रवाहात सामील झाले आहेत.

**उपराष्ट्रपती-कर्नाटक दौरा**

उपराष्ट्रपती सी. पी. राधाकृष्णन आज कर्नाटकच्या दौऱ्यावर जात आहेत. तुमकूर इथल्या श्री सिद्धगंगा मठात श्री शिवकुमार महास्वामीजी यांच्या 7व्या पुण्यतिथी सोहळ्यात ते प्रमुख पाहुणे म्हणून सहभागी होतील. तसंच बंगळूर येथील इथल्या सीएमआर इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजीच्या रौप्य महोत्सवी समारंभालाही उपराष्ट्रपती उपस्थित राहणार आहेत.

**सायकलिंग स्पर्धा**

पुणे ग्रँड टूरच्या मुळशी-मावळ टप्प्यात चीनच्या 'ली निंग स्टार' संघाच्या ल्यूक मडग्वे यानं दमदार कामगिरी करत निर्विवाद वर्चस्व गाजवलं, तर भारतीय राष्ट्रीय संघाच्या हर्षवीर सिंग सेखॉन यानं सर्वोत्तम

भारतीय सायकलपटू ठरण्याचा मान पटकावला. ल्यूक मडग्वे यानं 2 तास 21 सेकंदात सर्वप्रथम शर्यत पूर्ण केली. 'मराठा हेरिटेज सर्किट' या दुसऱ्या टप्प्यात आज 105 किलोमीटरच्या खडतर मार्गावर सायकलपटूंना 1 हजार 51 मीटरची उंची सर करावी लागणार असून, पुरंदर किल्ला, सिंहगड आणि खडकवासला तलाव परिसरातून हा टप्पा जाणार आहे.

**<u>सायना नेहवाल</u>**

ऑलिंपिक पदक विजेती सायना नेहवालने बॅडमिंटनमधून निवृत्ती जाहीर केली आहे. गुडघ्याच्या दुखापतीमुळे गेली दोन वर्ष सायना खेळापासून दूर होती. मात्र आता दुखणं बळावल्यामुळे आपण खेळणं थांबवत असल्याचं तिने एका पॉडकास्टच्या माध्यमातून जाहीर केलं. जागतिक क्रमवारीत अव्वलस्थान मिळवणारी ऑलिंपिक पदक जिंकणारी ती पहिली महिला भारतीय बॅडमिंटनपटू आहे. 2016 मध्ये रियो द जानिरो ऑलिंपिकच्या वेळी गुडघ्याला दुखापत झाल्यानंतरही 2017 च्या जागतिक अजिंक्यपद स्पर्धेत तिने कास्यपदक आणि 2018 च्या राष्ट्रकुल स्पर्धेत सुवर्णपदक जिंकलं होतं.

**<u>क्रिकेट</u>**

भारत आणि न्यूझीलंड संघादरम्यानच्या वीस षटकांच्या क्रिकेट सामन्यांच्या मालिकेला आजपासून प्रारंभ होत आहे. पाच सामन्यांच्या मालिकेतील पहिला सामना नागपूर मधील जामठा मैदानावर खेळला जाणार आहे. या सामन्यासाठी हजारो प्रेक्षक येण्याची शक्यता लक्षात घेता, नागपूर शहर पोलिसांनी, वाहतुकीचं नियोजन केलं आहे. वाहतूक कोंडी टाळण्यासाठी, प्रेक्षकांनी शक्यतो मेट्रोचा वापर करावा असं आवाहन करण्यात आलं आहे.

# याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं

# नमस्कार